रुग्णालयीन इमारतींची उंची ३० मीटर पेक्षा अधिक वाढविण्यास देण्यात आलेल्या मंजूरीमुळे मिळालेल्या रक्कमेचा विनियोग करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्र. अशसे-२०१४/प्र.क्र.१७१/नवि-२०
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- १२ मे, २०१५

वाचा:- १) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६
२) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना (सुधारणा )अधिनियम, २०१५

प्रस्तावना:-

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ च्या कलम ३ व त्याखालील अनुसूची १ व २ नुसार रुग्णालयीन इमारतींची उंचीची कमाल मर्यादा राष्ट्रीय इमारत संहिता, २००५ मधील तरतुदीनुसार ३० मीटर इतकी होती. सदर बंधनामुळे शासन, महानगरपालिका तसेच खाजगी रुग्णालयांच्या विकास, पुनर्विकासास बाधा येत होती. तसेच रुग्णांच्या सेवेसाठीच्या मागणीच्या तुलनेमध्ये रुग्णसेवेच्या सोयी-सुविधा अत्यंत अपुऱ्या पडत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे रुग्णालयीन इमारतींच्या कमाल उंचीबाबतची बंधने काढून टाकण्याबाबत सदर अधिनियमात सन-२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १२ महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम, २०१५ अन्वये दुरुस्ती करण्यात आली आहे. या दुरूस्तीच्या अनुषंगाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणांना प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग त्या त्या क्षेत्रातील अग्निशमन सुविधा वृध्दींगत करण्यासाठी बंधनकारक करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम, २०१५ च्या अनुसूची- एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आग प्रतिबंधक यंत्रणा बसविण्याच्या किमान आवश्यकतांची पुर्तता करीत असतील तर ४५ मीटर्स इतक्या उंचीपर्यंतच्या रुग्णालयीन इमारतींना मंजुरी देण्याचे अधिकार संबंधित नियोजन प्राधिकरणास राहतील.

२. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम, २०१५ च्या अनुसूची- एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आग प्रतिबंधक यंत्रणा बसविण्याच्या किमान आवश्यकतांची पुर्तता करीत असतील तर ४५ मीटर पेक्षा अधिक उंचीच्या रुग्णालयीन इमारतींच्या अशा प्रस्तावास मंजुरी देण्याचे अधिकार राज्य शासनास राहतील. .

३. वरीलप्रमाणे मंजूरी देण्याकरीता आकारण्यात येणाऱ्या शुल्काची रक्कम महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम २५ मधील तरतूदीनुसार स्थापन करण्यात आलेल्या "अग्नि सुरक्षा निधी" मध्ये जमा करण्यात यावी व सदर कलमाच्या तरतुदींच्या अधीन राहून तिचा विनियोग त्या त्या क्षेत्रातील अग्निशमन सुविधा वृध्दींगत करण्यासाठी वापरणे बंधनकारक करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१५०३३०१३१९१९४१२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Prakash Shankar Shete

Digitally signed by Prakash Shankar Shete
DN: CN = Prakash Shankar Shete, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.06.01 15:11:38 +05'30'

(प्र.शं.शेटे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव-१, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४) सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५) आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई
६) व्यवस्थापकिय संचालक, सिटी अँड इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट कार्पोरेशन, मुंबई
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट कार्पोरेशन, मुंबई
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई
९) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
१०) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
११) जिल्हाधिकारी (सर्व),
१२) मुख्याधिकारी, नगरपरिषद (सर्व)
१३) संचालक, अग्निशमन सेवा संचालनालय, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई
१४) नगर विकास विभाग (सर्व कार्यासने), मंत्रालय, मुंबई
१५) निवडनस्ती, (नवि-२०),

RNI No. MAHENG /2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक १५(३)] सोमवार, एप्रिल ६, २०१५/चैत्र १६, शके १९३७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ३३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Fire Prevention and Life Safety Measures (Amendment) Act, 2015 (Mah. Act No. XII of 2015), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M. A. SAYEED,
Principal Secretary and R.L.A. to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XII OF 2015.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 6th April 2015)*

An Act to amend the Maharashtra Fire Prevention and Life Safety Measures Act, 2006.

Mah. III of 2007. WHEREAS it is expedient to amend the Maharashtra Fire Prevention and Life Safety Measures Act, 2006, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Sixty-sixth Year of the Republic of India as follows :—

1. This Act may be called the Maharashtra Fire Prevention and Life Safety Measures (Amendment) Act, 2015. Short title.

Mah. III of 2007. 2. In section 3 of the Maharashtra Fire Prevention and Life Safety Measures Act, 2006 (hereinafter referred to as "the principal Act"),— Amendment of section 3 of Mah. III of 2007.

*(a)* in sub-section *(1)*, in the *Explanation*, after the words and figures " the National Building Code of India, 2005" the words and brackets "or, as the case may be, the parameters laid down, from time to

time, by the National Fire Protection Association Institution (U.S.A.)", shall be inserted ;

(b) after sub-section (1), the following sub-section shall be inserted, namely :—

"(1A) Notwithstanding anything contained in sub-section (1) or any other provision of this Act or any other law for the time being in force, building above 30 meters in height but not exceeding 45 meters in height may be permitted, in case of occupancies specified as (C-1) in Schedule-I, that is to say, Hospitals, Sanatoria and Nursing Homes, if such building fulfills the minimum requirement of fire fighting installations specified in Schedule-I.";

(c) after sub-section (2), the following sub-section shall be inserted, namely :—

"(2A) Notwithstanding anything contained in sub-section (2) or in any other law for the time being in force, the State Government may, upon a request by a planning authority, permit the authority empowered to sanction the construction plan of any building or part of a building and to issue certificate of completion of or part thereof, to issue such certificate, in respect of a building exceeding 45 meters in height in case of occupancies specified as (C-1) in Schedule-I, that is to say, Hospitals, Sanatoria and Nursing Homes, if such building fulfills the minimum requirement of fire fighting installations specified in Schedule-I.".

Amendment of Schedule-I to Mah. III of 2007.

3. In Schedule-I to the principal Act,—

(a) under the heading "INSTITUTIONAL BUILDINGS (C)", under sub-heading "(a) Hospitals, Sanatoria and Nursing Homes (C-1)", after entry (3), the following entries shall be added, namely :—

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| "(4) | Above 30m and not exceeding 45 m in height | R | R | NR | R | R | R | R | R | R | 1,50,000 | 30,000 | 2,400 | NR |
| (5) | Above 45m in height | R | R | NR | R | R | R | R | R | R | 1,50,000+ 5,000 per 5m above 45m | 30,000+ 5,000 per 5m above 45m | 2,400+ 1,000 per 5m above 45m | NR"; |

(*b*) in the NOTES,—

(I) in Note 12, for the word and letter "Group C" the words, letters and figures "Group C-2, Group C-3" shall be subsituted ;

(II) after Note 12, the following Notes shall be inserted, namely :—

"**12A.** Building above 30m in height but not exceeding 45m in height may be permitted for Group C-1 occupancies, provided it complies or, is in consonance with the parameters laid down, from time to time, by the National Fire Protection Association Institution (U.S.A.) in respect of such occupancies.

**12B.** Building above 45m in height may be permitted for Group C-1 occupancies, in the manner provided by sub-section (*2A*) of section 3, provided it complies or, is in consonance with the parameters laid down, from time to time, by the National Fire Protection Association Institution (U.S.A.) in respect of such occupancies.".

**4.** In Schedule-II to the principal Act,— Amendment of Schedule-II to Mah. III of 2007.

(*a*) in PART-I, under the heading "INSTITUTIONAL BUILDINGS (C)", under sub-heading "(a) Hospitals, Sanatoria and Nursing Homes (C-1)", after entry (3), the following entries shall be inserted, namely :—

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| "(4) | Above 30m and not exceeding 45 m in height | 20.00 | 1,50,000 | 15.00 | 1,00,000 | 12.00 | 75,000 | 6.00 | 30,000 | 5.00 | 15,000 |
| (5) | Above 45m in height | 25.00 | 2,00,000 | 18.00 | 1,20,000 | 15.00 | 90,000 | 7.00 | 40,000 | 6.00 | 20,000"; |

(*b*) in PART-II, under the heading "INSTITUTIONAL BUILDINGS (C)", under sub-heading "(a) Hospitals, Sanatoria and Nursing Homes (C-1)" after entry (3), the following entries shall be inserted, namely :—

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| "(4) | Above 30m and not exceeding 45 m in height | 10.00 | 50,000.00 | Not Allowed | Not Allowed | Not Allowed |
| (5) | Above 45m height | 15.00 | 75,000.00 | Not Allowed | Not Allowed | Not Allowed"; |

(*c*) in PART-III, under the heading "INSTITUTIONAL BUILDINGS (C)", under sub-heading "(a) Hospitals, Sanatoria and Nursing Homes (C-1)", after entry (3), the following entries shall be inserted, namely :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| "(4) | Above 30m and not exceeding 45m in height | 17.00 | 1,50,000 | 14.00 | 80,000 |
| (5) | Above 45m in height | 20.00 | 2,00,000 | 16.00 | 1,00,000.". |

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.